# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

## फेर ई-लिलाव सुचना

जा.क्र.नांवाशमनपा/उद्यानवि/ 7709 /2024 दि.01../10/2024

सर्व जनतेस व ठेकेदारांना या जाहिर ई-लिलाव (E-AUCTION) सुचनेद्वारे कळविण्यात येते की, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील माता गुजरिजी विसावा उद्यानातील नव्याने तयार करण्यात आलेला Adventure Park चालविणेसाठी 03 वर्षाच्या कालावधीकरीता द्यावयाचा असुन कामाच्या गणवत्तेनुसार पुढे 02 वर्षाकरीता मुदतवाढ देण्यात येईल. ईच्छुक लिलावधारकांना ठेकेदारांना लिलावात विहित मुदतीत भाग घेण्यासाठी https://eauction.gov.in) या संकेतस्थाळावर digital signature चे रजिस्ट्रेशन करणे अनिवार्य आहे. लिलावधारक ठेकेदार यांनी लिलावाची कोरी निविदा किमंत (Tender Fee) रुपये 500/- नापरतावा व इसारा रक्कम EMD रुपये 5000/- रक्कमेचा राष्ट्रीयकृत बैंकेच्या धनाकर्ष (डी.डी.) च्या स्वरुपात सादर करावा. तसेच ई-लिलाव भरणा करतांना सर्व आवश्यक कागदपत्रे ऑनलाईन दिलेल्या नियम व अटीनुसार सिलबंद लिफाफ्यात आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांचे नावे उद्यान विभाग येथे जमा करावेत. ई-लिलाव प्रक्रियेचे वेळापत्रक खालील प्रमाणे आहे,

| अ.क्र. | तपशिल | लिलाव प्रसिध्दीचा दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| 1 | लिलाव प्रसिध्दी दिनांक | 02/10/2024 | 15:00 पासुन |
| 2 | कागदपत्र व इसारा रक्कम सुरु करण्याचा दिनांक व वेळ | 02/10/2024 | 15:00 पासुन |
| 3 | कागदपत्र व इसारा रक्कम सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | 08/10/2024 | 15:00 पर्यंत |
| 4 | कागदपत्र व इसारा रक्कम मंजुरीचा दिनांक व वेळ | 08/10/2024 | 15:00 पासुन |
| 5 | कागदपत्र मंजुरीचा अंतिम दिनांक व वेळ | 09/10/2024 | 18:00 पर्यंत |
| 6 | ई-लिलाव सुरु करण्याचा दिनांक व वेळ | 10/10/2024 | 11:00 पासुन |
| 7 | ई-लिलाव अंतिम दिनांक व वेळ | 10/10/2024 | 16:00 पर्यंत |

कोणतेही कारण न देता लिलाव अंशतः, पुर्णता मंजुर किंवा नामंजुर करण्याचा अंतिम अधिकार मा. आयुक्त. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड यांनी राखुन ठेवला आहे.

ई-लिलाव बाबत काही शंका अथवा तांत्रिक अडचणी असल्यास कृपया 9011000950 या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा.

**(मा. आयुक्त यांच्या मान्यतेने)**

उपायुक्त (उद्यान)
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

प्रति

1.अ)दै. सामना (विभागीयस्तर) ब)दै. श्रमिक एकजूट (जिल्हास्तर) यांना देऊन कळविण्यात येते की, सदरच्या जाहीर लिलावाची जाहिर सूचना आपल्या दि 02/10/2024 रोजीच्या वृतपत्रात 16 X 15 चौ.से.मी. आकारात कमीत कमी जागेत प्रसिध्द करुन बिलाच्या 2 प्रतीसह सादर करावे.

2.मुख्य लेखापरिक्षक, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

3.अंतर्गत लेखापरिक्षक, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

4.मुख्य लेखाअधिकारी, नांदेड वाघाळा शहर महासन पालिका, नांदेड.

5.ई-टेन्डर, संगणक विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

6.जनसंपर्क विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

उपायुक्त (उद्यान)
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील माता गुजरिजी विसावा उद्यानातील नव्याने तयार करण्यात आलेला Adventure Park चालविणेसाठी नियम व अटी खालीलप्रमाणे आहेत.**

1) शॉपअ‍ॅक्ट प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक.
2) मागील तिन वर्षाचे आयकर भरणा केल्याचे प्रमाणपत्र सादर करावे(2020-21 ते 2022-23)
3) GST नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक.
4) ई-लिलावात भाग घेण्यासाठी ई-लिलाव फिस रुपये 500/- ना परतावा व इसारा (EMD) रुपये 5000/- (पाच हजार रुपये फक्त) महानगरपालिकेत जमा करावी लागेल.
5) Adventure Park च्या ई-लिलावासाठी सरकारी बोली/बेसरेट 50,000/- (अक्षरी रुपये पन्नास हजार फक्त) प्रतिमहा राहील. तसेच बोली 5000/-च्या पटीमध्ये बोलने अनिवार्य आहे.
6) मक्त्याचा कालावधी आदेश दिल्यापासुन सुरवातीला तिन 03 वर्षाकरीता राहील व त्यानंतर कामाच्या गुणवत्तेनुसार ठेक्यास पुढील 02 वर्षासाठी मुदतवाढ देण्यात येईल. तसेच 03 वर्षानंतर मुदतवाढ देणे अथवा नाकारणे हे सर्वस्वी महानगरपालिकेच्या अधिकारात राहील. त्याबाबत संस्थेचा हक्क राहणार नाही.
7) E-Auction लिलावानंतर मंजुर दरमहा ठेक्याच्या तिनपट रक्कम पुर्ण ठेका कालावधीत महानगरपालिकेकडे विनाव्याजी सुरक्षा अनामत रक्कम म्हणुन करारनाम्यापुर्वी जमा करावी लागेल. सदर रक्कम ठेका कालावधीमध्ये काम समाधानकारक पुर्ण केल्यानंतरच विहित पद्धतीने परत करण्यात येईल.
8) जाहिर ई-लिलावात ज्याची बोली रक्कम जास्त त्याचे नावे मक्त देण्यात येईल. बोलीत आलेल्या रक्कमेची पुर्ण रक्कम सात दिवसाच्या आत महानगरपालिकेत जमा करुन परवाना घ्यावा लागेल.
9) महानगरपालिकेतर्फे नियमाप्रमाणे वेळोवेळी देण्यात येणा-या आदेशाची अमलबजावणी करावी लागेल. नियमाविरुध्द कृती केल्यास व आदेशाचे पालन न केल्यास परवाना रद्द करुन जमा रक्कम महानगरपालिका फंडात जमा करण्यात येईल. व पुनर ई-लिलाव करण्यात येईल.
10) नैसर्गीक अथवा इतर कारणाने नुकसान झाल्यास किंवा उपकरणात बिघाड झाल्यास त्याची सर्वस्वी जवाबदारी आपली राहील. त्यास महानगरपालिका जबाबदार राहणार नाही. यासाठी माफी अथवा नुकसान भरपाईसाठी अर्ज करता येणार नाही.
11) सदरील मक्त्याचे पूर्ण अधिकार मा.आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड यांना राहतील. व तो निर्णय आपणांस बंधनकारक राहील.
12) ADVENTURE PARK चे दर मनपा प्रशासकीय सर्वसाधारण सभा ठराव क्र.04 दिनांक 19.06.2024 अन्वये ZIPLINE-Rs.50/-, ROCKET EJECTOR-Rs.50/-, ROPE COURSE-Rs.50/-, ROCK CLIMBING-Rs.50/-, RAPPLING–Rs.50/-, NET CLIMBING-Rs.50/-, BUNGEE RUN-Rs.50/-, ALL ACTIVITIES TOGETHER (PACKAGE)-Rs.200/- याप्रमाणे राहतील व त्याप्रमाणे दरफलक दर्शनी भागावर ठळक अक्षरात लावावे लागतील.

PTO...

13) ॲडव्हेंचर पार्क अंतर्गत सर्व खेळ चालविणेसाठी या क्षेत्रातील अनुभवी व मान्यता प्राप्त संस्थेचे प्रशिक्षित कर्मचारी नेमण्यात यावेत.

14) नेमण्यात आलेल्या सर्व कर्मचाऱ्यांचे/ऑपरेटरचे वेतन हे प्रचलीत कामगार कायद्यातील तरतुदी नुसार (किमान वेतन, EPFO/ESIC इत्यादी) आपल्या संस्थेद्वारे अदा करण्यात यावे.

15) संस्थेकडे वैध EPFO/ESIC नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

16) सदर प्रकरणी काही दुर्घटना/जीवीतहानी/वित्तहानी इत्यादी घडल्यास त्याबाबत नुकसान भरपाईची सर्वस्वी जबाबदारी हि आपल्या संस्थेची राहील. त्याबाबत नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.

17) संस्थेने थर्डपार्टी इन्श्युरन्स काढणे बंधनकारक आहे.

18) सदर प्रकरणी काही कारणाने ॲडव्हेंचर पार्क मधील उपकरणास(मशीनमध्ये)बिघाड झाल्यास अथवा मोडल्यास सदर उपकरण/मशीन दुरुस्त करण्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील.

19) कोणतेही कारण न सांगता ॲडव्हेंचर पार्क बाबतची E-Auction प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकारी मा. आयुक्त यांनी राखुन ठेवले आहेत.

**(मा. आयुक्त यांच्या मान्यतेने)**

उपायुक्त (उद्यान)
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

प्रत :-

E-Auction संगणक विभाग,नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड यांना कार्यवाहीस्तव.